## प्रकरण पहिले

# तात्यासाहेब कोरे व्यक्ती परिचय

❋ प्रकरण पहिले ❋

# तात्यासाहेब कोरे व्यक्ती परिचय

**प्रस्तावना :-**

व्यापार आणि सावकारी व्यवसायाचा वारसा लाभलेले घराणे म्हणजे 'कोरे घराणे' होय. कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुक्यातील कोडोली हे खेडे गाव, वारणा नदीच्या दक्षिणेस व किल्ले पन्हाळयाच्या पायथ्याशी पूर्वेस वसलेले आहे. कोरे घराण्याचा पूर्वइतिहास पाहताना घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची होती. या गरिबीमुळे श्रमाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. कोरे घराणे म्हणजे श्रमावर शंभर टक्के श्रध्दा, विश्वास असणारे घराणे होय. या घराण्यामध्ये बाळाप्पा नरसाप्पा कोरे व आण्णाप्पा नरसाप्पा कोरे हे दोन कर्तबगार बंधू होते. यथाकालावधीमध्ये या दोन बंधूचे विवाह झाले. सौ.कृष्णाबाई बाळाप्पा कोरे व सौ.भागीरथीबाई आण्णाप्पा कोरे हया यांच्या धर्मपत्नी होत.

**तात्यासाहेब यांचा जन्म व बालपण :-**

आण्णाप्पा व भागीरथी यांच्या पोटी काशीबाई, विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब व दिनकर यांचा जन्म झाला. या घराण्यात सर्वात मोठी म्हणजे बहीण काशीबाई हिचा जन्म झाला. काशीबाई नंतर अश्विन वद्य त्र्योदशी शके १८३६ याचा अर्थ दि १७ ऑक्टोबर १९१४ रोजी विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब यांचा जन्म झाला. तात्यासाहेब यांना आईचे दूध मिळाले हे त्यांचे भाग्य होय. कारण '१९१८ च्या आसपास कोल्हापूर संस्थानात प्लेग, कॅलरा, मलेरिया हया रोगांनी भयंकर उच्छाद मांडला होता हयावेळी कोडोलीला प्लेगचा उपसर्ग पोहोचला व हया प्लेगने त्यांच्या आईचा (भागीरथीबाई) बळी घेतला'[१] तात्यासाहेब कोरे यांच्यावर मोठा आघात झाला होता. त्यावेळी त्यांना काही कळत नव्हते. जीवनात एक पोकळी निर्माण झाली, पोरके

वाटले परंतु त्यांचे एकत्र कुटुंब असल्यामुळे व त्यांच्या काकू कृष्णाबाई हया प्रतिमाताच झाल्या होत्या. स्वतःच्या मुलाप्रमाणे त्यांनी त्यांचे बालपणी संगोपन केले. तसेच त्यांचा बाल हट्ट पुरविला आणि एकत्र कुटुंबामुळे त्यांना कशाचीच कमतरता भासली नाही. कृष्णाबाई यांना बऱ्याच कालावधीनंतर आपत्याचा लाभ झाला. त्यामुळे आणखी एका चुलत भावाची संगत लाभली. विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब यांना त्यांचा सख्खा भाऊ दिनकर, बहिण काशीबाई अशी भांवडे असताना आईचे छत्र लोपल्यामुळे वडीलांनी दुसरा विवाह केला. त्यावेळी तात्यासाहेब सहा-सात वर्षाचे होते. त्यांच्या बालपणी पुन्हा त्यांना दोन भाऊ व तीन बहिणी यांची भर पडली त्यामुळे कोडोली येथे त्यांच्या घरात त्यांना गोकुळाचा बालपणी अनुभव लाभला. कृष्णाबाई यांच्या प्रेमामुळे त्यांना बालपणी खाण्या-पिण्याची काहीच कमतरता भासली नाही. कृष्णाकाकू व आजी आऊ यांच्या प्रेमावर कोरे घरातील लहान-लहान भावंडे लहानाची मोठी होत होती. यामध्ये तात्यासाहेब हे सर्वात थोरले होते. कोरे घराण्यात यांची एक नवीन पिढी उदयास आली या नव्या वंश-वेलीवर विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब प्रमुखच म्हणून त्यांना बालपणी बहुमान मिळाला.

तात्यासाहेब हे बालपणी वडिलांच्या व चुलते दादांच्या बरोबर बऱ्याच वेळी दुकानात बसत असत. दुकानामध्ये कोडोली परिसरातील लोकांची होणारी गर्दी ही तात्यासाहेब यांना त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करणारी होती. कारण व्यवहारात विविध प्रकारची माणसे कशी वागतात याचा अनुभव बालपणीच आला होता. त्यात भर अशी की, कोडोली परिसरात कोरे घराणे व्यापारी म्हणून प्रसिध्द होते. त्यांच्या बालपणी वडील आण्णाप्पा व चुलते बाळाप्पा या कोरे घराण्यातील कर्तबगार बंधूनी पोखले, जाखले, पारगाव, तळसंदे व मुख्य गांव कोडोली या पंचक्रोशीमध्ये नावलौकिक वाढविला होता.[१] वर्ष १९२३ मला असे वाटते की, आमच्या दुकानाची खूप चलती

होती. दसरा दिवाळीचे दिवस होते. ऑक्टोबर महिना चालू होता. सराफी दुकान व कापड दुकान या दोन्ही दुकानांची भरभराट होती.[२] हे कोडोली गावाच्या परिसरातील गावांना माहित होते. त्यावेळी दरोडयाचे प्रस्त जास्त प्रमाणात होते. तात्यासाहेबांच्या बालपणी त्यांच्या दुकानावर दरोडा पडला. त्याचे पडसाद त्यांच्या बालमनावर जसेच्या तसे कोरले. कारण दरोडयाचे स्वरूप अतिशय भयानक होते की, त्यांची मोजदाद करताना कोरे घराण्याच्या संपत्तीचा अंदाज येतो. कोरे बंधूच्या अविश्रांत कष्टाला यश येत असताना जणू मूळावरच घाव घातला गेला. रात्र दिवस केलेल्या कष्टाचे फळ हे असे मिळाले काय? या प्रश्नाचा उलगडा कोरे बंधूना होईना झाला. त्यांच्या मनात राहून राहून झालेल्या सांपत्तिक हानीचा विचार सतत अस्वस्थ करीत होता. या दरोडेखोरांनी केलेली लूट तात्यासाहेब यांच्या बालमनावर आघात करणारी ठरली. या दरोडयामुळे तात्यासाहेब यांना पैसे, संपत्ती मिळविणे व व्यवहार करणे तसेच समाजात असणाऱ्या अडचणींना तोंड देणे यांचे ज्ञान व व्यवहार चातुर्य बालपणीच अवगत झाले. पूर्वीचे वैभव मिळविण्यासाठी कोरे बंधूनी केलेली पुनश्च बांधणी हे तात्यासाहेब यांच्या बालपणीचे उत्तम संस्कार मानावयास हरकत नाही. त्यामुळे त्यांचे मन खंबीर होण्यास बालपणीच मदत झाली. ग्रामीण भागात असे दरोडयासारखे अनुचित प्रकार घडतात व एखाद्याच्या चांगल्या कार्यात अडथळा येतो हे बालपणीच तात्यासाहेबांना अनुभवास आले. कोरे घराण्यात तात्यासाहेब हे सर्वात थोरले असल्यामुळे त्यांच्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन वेगळाच होता कारण ते मोठे असल्यामुळे घरातील सर्व जबाबदारी त्यांच्यावरच होती.

**<u>तात्यासाहेब कोरे यांचे शिक्षण</u> :-**

कोरे घराणे हे ग्रामीण भागातील व्यापार व सावकारी करणारे असल्यामुळे संख्यालेखन, अंकगणित तसेच मूळाक्षरे यांचे ज्ञान व प्राथमिक आलेख या

घराण्यातील मुलांना चटकन होत असे. कारण व्यवहारातील प्रत्यक्ष आकडे मोड दुकानात केली जात असे. त्याचे अवलोकन करण्याचे प्रयत्न तात्यासाहेब व बंधू नाना यांचे कार्य चालत असे याचा अर्थ जे प्राथमिक शिक्षण आहे हे त्यांना घरीच थोडेबहुत मिळाले.

'सन १९२१ साली तात्यासाहेब सात वर्षाचे असताना शाळेत घालण्यात आले ही शाळा म्हणजे कोडोली मधील प्राथमिक मराठी शाळा. ही सरकारी शाळा होती. त्यावेळी कोडोली येथे व्हन्यक्यिूलर फायनल पर्यंतचाच शिक्षणक्रम पूर्ण करणे शक्य होते. या परीक्षेला त्या काळात मुलकी परीक्षा म्हणत असत. मुहूर्त पाहणे, तिथी पाहणे हे आमच्या घरात पूर्वीपासून असल्यामुळे चैत्र पाडव्याच्या मुहूर्तावर आण्णा मला शाळेत घेऊन गेले. नानाचे ही नाव माझ्याबरोबरच या सरकारी शाळेत पटलावर दाखल करण्यात आले. तात्यासाहेब यांना पहिलीत व दिनकर (नाना) ला इन्फण्टीत. हा एक उपचाराचा भाग होता. शाळेत शिकवीली जाणारी मुळाक्षरे संख्या-लेखन आणि जुजबी अंकगणित यांची ओळख आण्णांनी आधीच करवून दिली होती. त्यामुळे शाळेत जाणे तात्यासाहेब यांना आनंददायक वाटत होते.'[३]

ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हटला की, कष्ट करून शिकणारा, आर्थिक परिस्थिती बेताची अशी अवस्था डोळयासमोर उभी राहते. परंतु तात्यासाहेब हे जिद्दी, अंतर्यामी परिश्रम घेणारे असे त्यांचा स्वभाव वैशिष्टये होय. शाळेत पहिला नंबर असला पाहिजे अशी अपेक्षा मनात बाळगणारे होते. त्यांना शिक्षण घेताना घरातील वातावरण अनुकूल होते. त्यामुळे त्यांचे कार्य सर्वांग सुंदर, सर्वोत्कृष्ट, सर्वोत्तम होत असे. तात्यासाहेब यांना शिक्षण घेताना पाठांतर व अवांतर वाचन यावर भर असे. यामुळे वर्गात पहिला, दुसरा क्रमांक येण्याची इच्छा पूर्ण होत होती. या शिवाय तात्यासाहेब कोरे यांना त्यांच्या वडिलांकडून शिस्त व स्थिर मनाने कागदपत्रे हाताळणे, हिशेब निट नेटका

ठेवणे. हया दृश्याचा व त्यांनी अंगीकारलेल्या सवयीचा फायदा कोणतेही काम उत्तम व्हावे यासाठी झाला.

तात्यासाहेब कोरे यांना बालपणी त्यांच्या वडिलांनी आणखी एक सवय लावली होती. ती म्हणजे धार्मिक ग्रंथ वाचणे. '१९२१-२२ चा काळ व कोडोली सारखे ३-४ हजार वस्तीचे गाव होते. हे पाहता वाचनालये व ग्रंथालये यांची काय अवस्था असेल ते अनुमानानेच जाणावे ! त्या परिस्थितीत वाचन म्हटले की त्याचीही मर्यादा कोणती हे जाणल्याशिवाय त्या वाचनाचे महत्व कळू शकणार नाही. पुराणे हेच काय ते साहित्य, वाङमय वगैरे वगैरे, मराठीतील प्रख्यात कवीचे रामविजय हरिविजय, भक्तिविजय, पांडवप्रताप, इत्यादी धार्मिक ग्रंथ वाचले शिवलीलामृताचेही श्रध्दायुक्त वाचन तात्यासाहेबांनी अनेकदा केले. हे ग्रंथ वाचताना तात्यासाहेबांचे मन त्यातील कथानकात, पत्रांच्या घडामोडीत व नैतिक उद्दिष्ठांत खूपच रंगून जात असे. त्यांनी हे सर्व ग्रंथ वाचले एवढेच नव्हे तर इयत्ता चौथीमध्ये गेल्यानंतर तर हे ग्रंथ ते घरातील व शेजारपाजारच्या स्त्रियांना वाचून दाखवत होते.'[४] यामुळे तात्यासाहेबांच्या शैक्षणिक ज्ञानात भर पडे. या धार्मिक ग्रंथातील पात्रे त्यांना कधीच काल्पनिक वाटली नाहीत. तात्यासाहेबांनी धार्मिक ग्रंथातील कथा चरित्र यामुळे शिक्षणात आणखी भर पडली याशिवाय शालेय शिक्षण घेताना घरातील व्यापारी व्यवहारातील गणिते, तोंडी गणिते यांचा ही यावर परिणाम झाला व शिक्षणाचा दर्जा व उत्तम गुण मिळविण्यास मदत झाली. घरी व्यवहारातील हिशोब करताना तात्यासाहेबांना तोंडी प्रश्न विचारले जात होते. त्यामुळे व्यवहारी स्वरूपाची गणिते याचा फायदा होऊन त्यांच्या ज्ञानात वाढ होण्यास मदत झाली. याचे साधे उदा.द्यावयाचे म्हणजे तात्यासाहेबांचे वडिल आण्णा हे व्यवहारी पुरूष होते. 'ते सहज तोंडचे काही हिशोब घालत असत. गुंजभर सोन्याला इतके पैसे तर एका माशाला किती? एका माशाला अमुक पैसे तर तोळयाला किती?'[५] असे प्रश्न नेहमी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तात्यासाहेब यांना विचारत असत शाळेत श्री.रामचंद्रराव राजमाने व श्री वाजे हे हेडमास्तर यांनी शाळेत चांगले संस्कार केले. त्यांना चांगल्या प्रकारची शिस्त लावली. शाळेत शिकत असताना अनेक प्रकारच्या म्हणजे गृहपाठ, घंटेपूर्वी शाळेत येणे, पाठांतर, तोंडी गणिते, वर्गातील अभ्यास यासारख्या गोष्टी तात्यासाहेबांनी अवगत केल्या. त्यामुळे त्यांना कोणत्याही स्पर्धेत भाग घेताना सोपे झाले. श्री.राजमाने गुरूजी हे शालेय शिक्षणाबरोबर सर्वसामान्य ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करीत असत.'धर्म ईश्वर यांच्या विषयी श्रध्दा वाटेल अशी त्यांनी शिकवणूक दिली. आपल्यापेक्षा वयाने मोठया अशा प्रत्येक व्यक्तीविषयी आदर बाळगावा व त्यांच्या आज्ञेचे पालन करावे हे त्यांनी विद्यार्थी दशेत असणाऱ्या तात्यासाहेब यांना शिकविले. लहानपणी त्यांचा कल खेळाकडे व व्यायामाकडे होता'[६] तात्यासाहेबांच्या शैक्षणिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होत होता. त्यावेळी कोडोली गावात सणा-समारंभा निमित्ताने विविध प्रकारची वाद्ये वाजवली जात होती. त्यामध्ये तात्यासाहेबांचा सहभाग उत्साहाने होत असे. त्यामुळे वाद्याचे शिक्षण अवगत झाले. 'गावागावात त्याकाळी आढळणारी रणहलगी वाजवायला ते शिकले होते. लेझीम खेळणेही त्यांना खूप आवडत असे. त्यावेळी श्री आण्णा महाजन यांनी तात्यासाहेब यांना व त्यांच्या मित्रामध्ये टिपऱ्यांचा मेहा बसविला होता. त्याचा फायदा त्यांना गणेशोत्सवात झाला. शाळेच्या व्यतिरिक्त उरलेला जो वेळ होता तो त्यांच्या वडिलांच्या जवळ बसून ते सांगतील ती कामे करण्यात जात असे. इतर सर्व भावंडापेक्षा तात्यासाहेब मोठे होते व दुसरी गोष्ट अशी की, वडिलांनी त्यांना स्वतःकडे आकर्षून घेतलेले होते. तात्यासाहेब जेथे तेथे नानाही असे त्यामुळे तात्यासाहेब व नाना याचा शैक्षणिक व सांस्कृतिक वाढ जवळजवळ सारखीच होत गेली.'[७]

१९२७ साली कोडोलीच्या शाळेतून ते सहावी पास झाले त्यावेळी

त्यांचे वय १२ वर्षे होते. १९२७ च्या जून महिन्यात मुलकी परीक्षेचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी मराठी शाळेतील सातवीत बसयाचे की, इंग्रजी शाळेत नाव दाखल करायचे असा पेच उभा राहिला. शेवटी ते इंग्रजी शाळेत गेले. इंग्रजी शाळेत तात्यासाहेबांना विलक्षण गुरू श्रीधरपंत यांचे मार्गदर्शन लाभले. इंग्रजी भाषेचे ज्ञान घेताना श्रीधरपंत गुरूजी संस्कृत, मराठी भाषेचे ही ज्ञान विद्यार्थ्यांना देत असत. याशिवाय विहीरीमध्ये पोहणे, स्वयंपाक करणे याचेही प्रशिक्षण या गुरूकडून लाभले.

प्रामुख्याने महत्वाचे म्हणजे त्यावेळी स्वातंत्र्याविषयी, स्वातंत्र्य चळवळीविषयी, देशभक्ती विषयी त्यांनी तात्यासाहेब यांच्या मनात एक नवीन उर्मी निर्माण केली. तसेच भारतीय संस्कृती व भारत वर्ष या संदर्भातील ज्ञान व माहिती तात्यासाहेब यांना मिळाली. त्यामध्ये गुरूजी विद्यार्थ्यांशी चर्चा करताना राष्ट्रवाद, राष्ट्रभक्ती या संदर्भात त्याग, प्रेम, खरे सुख इत्यादी महत्वाचे विचार व संस्कार तात्यासाहेब कोरे यांच्या मनावर झाले व जे इच्छित शिक्षण होते ते त्यांना मिळत होते. परंतु श्रीधरपंत हे गुरूजी अतिशय कडक शिस्तीचे होते. अभ्यासात टाळाटाळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा देत. शिक्षेच्या भितीने वर्गातील विद्यार्थी अभ्यासात कधीच चुकारपणा करीत नसत. परंतु जे अभ्यास चुकवितात त्यांना त्यांच्या पालकांची दखल न घेता जबर शिक्षा करीत असत. याचा उलट परिणाम होऊ लागला. एके दिवशी श्रीधरपंत गुरूजींनी काही विद्यार्थ्यांना बेदम मारले. त्यांचे पालक खूपच संतापले. एकतर श्रीधरपंत गुरूजींना मारहाण होणार किंवा हे गाव सोडून जावे लागणार अशी अवस्था निर्माण झाली.

तात्यासाहेबांच्या वडीलांनी गुरूजींना संरक्षण दिले. परोपकारीने समजावले. परंतु श्रीधरपंत मास्तर कोडोलीतून पळून गेले. त्यामुळे इंग्रजी तसेच मराठी शाळा बंद पडली. त्यामुळे तात्यासाहेब कोरे यांच्या शिक्षणाची अडचण आली. परंतु या

अडचणीवर तोडगा निघाला. तात्यासाहेबांच्या घरच्यांनी दोघा भावांची इंग्रजी शिक्षणासाठी सांगली येथे व्यवस्था केली. शाळा बंद पडल्याने यांच्या शिक्षणात खंड पडला. परंतु त्यांचे श्रीधरपंत गुरूजींच्या प्रभावी शैलीने स्मृति खंडीत होणे शक्य नव्हते. सांगलीत रेल्वे स्टेशन जवळ श्री क्षीरसागर यांचे प्रिपरेटरी क्लासेस होते. या शाळेतील शिक्षण पहिल्या वर्षात १-३ इयत्ता, दुसऱ्या वर्षी ४-५ इयत्ता करून घेणे अशा प्रकारचे होते. तात्यासाहेबांना वर्गात प्रवेश देण्यासाठी चाचणी द्यावी लागली, त्यामध्ये तात्यासाहेब पास झाले. त्यांना ताबडतोब ४ व ५ वी इयत्ताचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. नंतर लगेच सहा महिन्यात इंग्रजी पाचवीच्या परीक्षेला बसविले. ही परीक्षा चांगल्या गुणांनी ते पास झाले. त्याच पध्दतीने सहावी इयत्ता ही पूर्ण करण्यास पात्र झाले. दुसरे म्हणजे डॉ.बी.जे.मगदुम, तिसरे म्हणजे श्री.बी.ए.चौगुले यांचा तात्यासाहेबांच्या शालेय जीवनात विविध गोष्टी शिकण्यासाठी महत्वाचा सहभाग मिळाला.

त्यावेळी तात्यासाहेबांचे जिवलग मित्र व तात्यांची इतकी मैत्री पक्की झाली की एकत्र खेळणे, एकत्र खाणे, एकत्र जाणे-येणे, एकत्र बसणे, एकत्र अभ्यास असे चाले. तात्यासाहेबांनी शिक्षणाच्या बाबतीत आळस कधी केला नाही. शाळेतील विविध कामे ते आवडीने करीत. यातूनच त्यांचे नेतृत्व फुलत गेलेअसावे असा अंदाज करणे योग्य वाटते. यांच्या मैत्रीतून अभ्यास, दररोजचा दिनक्रम याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. तात्यासाहेबांनी मॅट्रीक होण्याची अनेक स्वप्ने रंगविली होती. परंतु त्यांना शिक्षण अर्धवट बंद करावे लागले. कारण त्यांच्या चुलत्यांचा कॅन्सरच्या रोगाने झालेला अचानक मृत्यु होय. त्यावेळी तात्यासाहेब १६ वर्षाचे होते. त्यांच्या घरावर पडलेल्या दरोडयानंतर दोघा भावांनी कापड व सराफी दुकानांचा जम बसविला होता. परंतु बाळाप्पा (दादा) यांच्या निधनाने कोरे बंधूंच्या या रथाचे एक चाक रस्त्यातच मोडून

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पडले. प्रगतीची गती थांबली. तात्यासाहेबांच्या वडीलांच्या मनाचा तोल ढासळला. त्यामुळे तात्यांना सांगलीची शाळा सोडून घरच्या कारभारात लक्ष घालण्यासाठी तात्काळ कोडोलीला यावे लागले, मॅट्रिक होता आले नाही. शिक्षण येथेच थांबले, त्यांना शाळेतील बाकावरून दुकानाच्या तराजूवर लक्ष वेधावे लागले. या शाळेय जीवनातच त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले होते. नेतृत्व गुण दिसत होते.

**तात्यासाहेब कोरे यांच्या ग्रामीण नेतृत्वाचा विकास :-**

प्रामुख्याने तात्यासाहेब कोरे यांचा ग्रामीण भागात नेतृत्वाचा विकास होण्यासाठी घरातील वातावरण, शालेय जीवनातील घटना, प्रसंग, मित्र आणि महत्त्वाचे म्हणजे १९३० ते १९३५ या कालावधीत आलेली संकटे यातून त्यांचे नेतृत्व विकसित झाले. तात्यासाहेब कोरे यांच्या चुलत्यांच्या निधनामुळे त्यांना शिक्षण बंद करून घरातील कारभारात लक्ष घालावे लागले. वडीलांचा मानसिक तोल दादांच्या मृत्यूने ढळला होता. त्यावेळी तात्यासाहेब लहान होते. 'तरी आता तेवढा लहान राहिलो नव्हतो मी घरातील सर्वात मोठा मुलगा आहे, याची जाणीव दादा-आण्णा नेहमी देत आले होते. त्यामुळे मानसिकदृष्ट्या त्यांची जडणघडण ही गंभीर प्रकृतीकडे झुकणारी अशीच होत आली होती.'[८] यामुळे तात्यासाहेब कोरे यांचे ग्रामीण भागात नेतृत्व उठून दिसण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होत होते. त्यांच्या वडील व चुलत्यांनी वाढविलेला व्यापार व सावकारी यांचा बोजा उचलण्याची तयारी झाली. कुळांना शेतीसाठी दिलेली कर्जे अगदी कायद्याचा बडगा दाखवून वसूल केली. वडीलांनी व्यवहारातील दिलेल्या माहिती व गुपितांची, बारकाव्यांची परिणिती वापरली हे घरचे कार्य करताना अनेक अडचणी आल्या. परंतु स्थिर बुध्दी आणि दृढचित्ताने काम केल्यामुळे ते प्रथम घरातील नेते, कार्यकर्ते बनले.

'याच लहान वयात एक कर्ता कुटुंब प्रमुख म्हणूनही त्यांच्यावर घरातील

मोठी जबाबदारी पडलेली होती. घरसंसार म्हणजे काय, तर लहान मोठी भांडीच भांडी एका भांडयाचा धक्का दुसऱ्याला लागणारच, तरीही शक्यतो आपल्या हातून अल्पशीही चूक होऊ नये, याची तात्यासाहेब खूप काळजी घेत असत. काही काही प्रसंगी अप्रिय वाटणारे कठोर निर्णयही घ्यावे लागत असत. पण ते केवळ कर्तव्यापोटी ते घेत असत.'[९] या वयात तात्यासाहेबांना निर्णय घेणे, कोणतेही कर्तव्य सचोटीने पूर्ण करणे, सार्वजनिक हितासाठी धडपडणे. घरातील तसेच बाहेरील लोकांची काळजी घेणे, हे ओघाने त्यांच्या ग्रामीण नेतृत्वाचा विकास होण्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण झाली. घरातील त्यांच्या काकू कृष्णाबाई यांनी त्यांना प्रोत्साहन देण्यास अतिशय मोलाचे सहकार्य केले. १९३०-३२ या कालावधीमध्ये तात्यासाहेबांच्यावर मोठया जबाबदाऱ्या पडल्या. यातूनच त्याचे नेतृत्व विकसित झालेले दिसते. शाळेतील जबाबदारी संपली आणि कौटुंबिक जीवनातील समतोलाचा काटा सांभाळू लागले. यावेळी ग्रामीण भागात स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणाची चाहूल लागली होती. राजर्षी शाहू महाराज यांनी कृषि - औद्योगिक विकासाच्या हेतूने ग्रामीण भागाला महत्त्व दिले होते. तात्यासाहेब कोरे व बेडग ता.मिरज येथील श्री.वीरसंगाप्पा आवटी यांची कन्या सावित्री यांचा विवाह १९३४ साली झाला. त्यामुळे जीवनासाथीची नेतृत्वाचा विकास होताना जास्तीची साथ मिळाली. तात्यासाहेबांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व धाडसी, कष्टाळू, संयमशील, सामाजिक जाणीव असणारे मन अशा विविध अंगानी ग्रामीण नेतृत्व तावून सुलाखून निघालेले त्यांच्या कार्यावरून दिसून येईल.

**तात्यासाहेब कोरे यांची तत्वप्रणाली :-**

कोणताही विचारवंत अथवा राजकीय नेता आपण पाहिल्यास त्याच्यावर तो ज्या समाजातून आला आहे त्या समाजातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला असतो. जगातील प्रख्यात

विचारवंताचा आपण अभ्यास करतो तेव्हा ते ठराविक विचाराकडे का वळेल असा आपल्यासमोर प्रश्न पडतो उदा. कार्लमार्क्स, प्लेटो, ॲरिस्टॉटल, महात्मा गांधी यांची उदाहरणे आपल्या डोळयासमोर घेतल्यास तत्कालीन परिस्थितीचा त्यांच्या विचारावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. तात्यासाहेब कोरे ज्या समाजामधून व ज्या परिस्थितीतून पुढे आले त्या समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो.

घरच्या कौटुंबिक परिस्थितीमुळे तात्यांच्या शिक्षणाला पूर्णविराम मिळाला होता. चुलत्याच्या निधनाने आण्णा म्हणजे तात्यांचे वडील यांच्या मनावर खोलवर दुःखाच्या जखमा झाल्या, त्यात तात्या घरातील सर्वात मोठे व इतर सर्व भावंडे लहान असल्यामुळे कौटुंबिक जबाबदारी त्यांच्यावर आली. घरचा व्यापार होता त्यामध्ये त्यांनी लक्ष घातले तसेच कोरे घराण्याची शेती म्हणजे 'डाग मळा'. या शेतीत ते कष्ट करू लागले. 'शेती ही अत्यंत सुपीक असल्यामुळे जेवढे कष्ट करावे तेवढे फळ हाती येत होते. कष्टाला निश्चित फळ असते हे तात्यांना कळले. हा 'डाग मळयाने' दिलेला एक सल्लाच होता. हा विचार तात्यांनी आपल्या आयुष्यात पुढे कायम जतन करून ठेवला. कोणतीही गोष्ट कष्टाशिवाय मिळत नाही. म्हणून त्यांनी कष्ट, प्रामाणिकपणा हया गोष्टींना प्रामुख्याने प्राधान्य दिले.'[१०] घरची शेती व्यवसाय सांभाळून समाजासाठी आपण काही तर करावे असे त्यांना वाटत होते. कारण त्यांचा पिंड हा कार्यकर्त्याचा होता. घरची परिस्थिती अर्थिकदृष्टया चांगली होती पण तात्यांचे त्यात मन लागेना, कारण शाळेत असताना तसेच त्यांचे जवळचे मित्र हे चळवळीत होते उदा.सांगलीचे डी.के.पाटील वगैरे. हा काळ १९३७-३८ चा होता. म.गांधी यांचे नेतृत्व १९२० पासून संपूर्ण देशात एकमुखाने पाळले जात होते. कारण त्यांच्या तोडीचा दुसरा नेता देशात नव्हता. त्यांच्या नेतृत्वाखाली १९२० मध्ये असहकार चळवळ, १९३० मध्ये सविनय

कायदेभंग, अशा चळवळी सुरू केल्या. राज्यकर्ते जनतेच्या इच्छेकडे दुर्लक्ष करून जर राज्यकारभार करीत असतील जनतेने राज्याचे कायदे पाळू नयेत असे गांधीजींचे विचार होते. त्याचाही परिणाम तात्यांवर झालेला होता. तसेच कोणतीही चळवळ करताना अहिंसात्मक मार्गाचाच स्वीकार करावा. १९३५ पासून तात्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. प्रजा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून काम करत असताना त्यांचा स्वातंत्र्य चळवळीशी जवळचा संबंध आला होता. देशात आणि महाराष्ट्रातही स्वातंत्र्य चळवळीचा जोर वाढला होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे प्रतिसरकार त्यावेळच्या पूर्ण सातारा जिल्हयात (आजचा सांगली जिल्हा यांचाही समावेश होतो.) कोल्हापूर जिल्हयात जोर धरू लागले होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारने ब्रिटीश सत्तेला सळो-की-पळो करून सोडले होते. तसेच ब्रिटीश धार्जिण्या लोकानांही जबर धाक बसला होता. नाना पाटील यांचे प्रतिसरकार संपूर्ण देशभर गाजू लागले होते. अशा चळवळीत तात्यांनाही देशसेवा करण्याची संधी मिळाली.

नाना पाटील, यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्हयात भाई माधवराव बागल, रत्नाप्पाआण्णा कुंभार, दिनकरराव देसाई ही मंडळी स्वातंत्र्य लढयात अग्रभागी होती. प्रजापरिषदेत काम करत असताना तात्यांचा अनेक नेत्यांशी संपर्क येऊ लागला. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व हया लढयात उजळून निघाले, वसंतदादा पाटील यांचे संघटना कौशल्य हया लढयात दिसले. अनेक स्वकतृत्वावर सामान्य शेतकरी कुटुंबातील तरूण पुढे येऊ लागले. देशासाठी कोणताही त्याग करण्यास ते तयार झाले. कोणत्याही परिस्थितीत देश स्वतंत्र झाला पाहिजे एवढाच ध्यास या मंडळींना लागला होता. पुढे १९४२ ची चले जाव चळवळ सुरू झाली. ठिकठिकाणी इंग्रजी सत्तेविरूध्द मोर्चे निघाले त्यात ते सहभागी झाले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसच्या अनेक वरीष्ठ नेत्यानी भाषणे केली. त्यात प्रामुख्याने मा.गांधी आणि सरदार पटेल यांच्या भाषणाचा तात्यांच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

विचारावर दिर्घकाळ परिणाम झाला होता. तात्यांनी १९४२ च्या लढयात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, डी.के.पाटील, रामभाऊ घाडगे यांच्या बरोबर राहून काम केले आणि ज्या कारणासाठी कित्येक हुतात्मे झाले, तो दिवस म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. एक जुलमी सत्ता जावून येथे आपले लोक कारभार पहात होते हे महान कार्य कसे घडले याचा ज्यावेळी तात्या विचार करू लागले तेव्हा त्यांना एक गोष्ट कळली की, कोणतेही सार्वजनिक कार्य करण्यासाठी एका व्यक्तीची शक्ती तेथे उपयोगी पडत नाही. तर त्यासाठी अनेक लोक एकत्र येऊन एखादा विशिष्ट उद्देश ठेऊन काम करू लागले तरच ते काम यशस्वी होऊ शकते. हाच विचार त्यांना आपले सहकार वाढविण्यास उपयोगी पउला. यामुळेच आज वारणानगर आकारास आले.

या काळात म्हणजे (१९२० ते १९४७) महात्मा गांधीच्या विचाराचा प्रभाव संपूर्ण देशावर होता. अर्थातच तात्यासाहेब कोरे सुध्दा गांधी यांच्या विचाराकडे आकर्षित झाले त्यांना गांधीजींच्या विचारापैकी 'सामाजिक समता' आणि 'ग्रामराज्य' या विचाराचा विशेष पगडा त्यांच्यावर होता. त्याच्या पुढील कार्यात वरील दोन विचार कायमस्वरूपी जोपासले. सामाजिक समतेमध्ये प्रामुख्याने समाजात असणारी वर्णव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यासाठी १५ ऑगस्ट १९४७ रोजी कोडोली या आपल्या गावी तात्यांनी 'सहभोजनाचा' कार्यक्रम केला. आज हा कार्यक्रम विशेष महत्वाचा वाटणार नाही. पण १९४७ साली सहभोजनाचा कार्यक्रम क्रांतीकारक होता. गांधीजींना अभिप्रेत असणारी सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा तात्यांनी आपल्या परिने प्रयत्न केला. संपूर्ण गावाने या कार्यक्रमाला साथ दिली म्हणूनच सहभोजनाचा कार्यक्रम शंभर टक्के यशस्वी झाला. तसेच कोणतेही काम करण्यासाठी योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. तात्यांचा स्वभाव हा शांत, संयमी होता त्याचाही परिणाम त्यांचे नेतृत्व

पुढे येण्यासाठी झाला. सर्वांना सामावून नेण्याची ताकद त्यांच्यामध्ये होती. गांधीजींची सत्य, अहिंसा या तत्वाचाही त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. तात्याचे एकूण व्यक्तिमत्व हे मा.गांधीच्या विचाराशी मिळते-जुळते आहे. तसेच ते धार्मिक वृत्तीचे होते. कोणतेही काम करत असताना शुभ काळ, वेळ पाहून चांगल्या कामाला सुरूवात करत होते. अर्थात शुभ वेळ पाहून एखाद्या कामाला सुरूवात केली म्हणजे सर्व काही ठिक होत नाही. त्यासाठी त्या काममागची तळमळ योग्य असणे आवश्यक आहे. गांधीजीही धर्म आवश्यक आहे असे मानणारे होते. पण धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, म्हणूनच ते म्हणतात 'मानवाच्या जीवनात व कृतीस जिवंत स्फूर्ती धर्मातून मिळते परंतु धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे तर प्राप्त कर्तव्य स्वच्छेने व जाणीवपूर्वक करीत राहणे असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता. सत्याची साधना करावयाची तर त्यासाठी अहिंसेचा मार्गच स्वीकारला पाहिजे. कारण अहिंसा सत्याचा आत्मा आहे. इतकेच नव्हे तर त्याचे मधुर फळ आहे. सत्य व अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व त्यांची फारकत करणे शक्य नाही.'[११] हा गांधीजीचा विचार विचारप्रणालीतून दिसून येतो.

<u>ग्रामराज्य</u> :-

गांधीजींच्या अनेक विचारांपैकी ग्रामराज्य हया विचाराचा तात्यांवर विशेष प्रभाव पडलेला दिसून येतो. 'देशाच्या उन्नतीसाठी गांधीजीनी ग्राम महत्त्वपूर्ण मानले आहे. प्रत्येक गाव स्वावलंबी राहील, सहकार्य हा त्याचा आधार राहील, गावातील लोक शांतीपूर्ण व गौरवशाली जीवन व्यतीत करती. अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे. गांधीजींचा आदर्श समाज पिरॅमिडसारखा नव्हे तर गोलाकार राहील. व्यक्ती त्याचा केंद्रबिंदू राहील.'[१२] गांधीजींच्या ग्राम राज्याचा थोडक्यात अर्थ असा अभिप्रेत होतो की, प्रत्येक गांव हा स्वावलंबी झाला पाहिजे. गावातील लोकांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्याच गावात लघु उद्योग सुरू

करावेत. म्हणून १९५४ पासून तात्यांनी सहकारी साखर कारखाना काढून सामान्य जनतेच्या हाताला काम दिले. तसेच शेतीला इतर जोडधंदे उपलब्ध करून दिले. त्यामुळे मोठया उद्योगावर छोटे उद्योगधंदे उभे राहिले. त्यामुळे खेडी सुधारली आहेत. आज वारणा परिसरातील अनेक खेडी ही स्वयंपूर्ण झाली ती केवळ तात्यांच्या नेतृत्वामुळेच. खेडी स्वयंपूर्ण झाल्यामुळे आर्थिक दारिद्रय नष्ट झाले आणि आर्थिक दारिद्रय नष्ट झाल्यामुळे लोक सामाजिक, राजकीय चळवळीत भाग घेऊ लागले. तात्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण जनतेत राजकीय जागृती मोठया प्रमाणात झाली. त्यामुळे खेडी सुधारली. गांधीजींना अभिप्रेत असणारी ग्रामराज्याची संकल्पना तात्यांनी आपल्या नेतृत्वामुळे वारणा परिसरात पूर्ण केली.

तात्यांच्या विचारावर महात्मा गांधी यांच्या सामाजिक समतेचा, ग्रामराज्य संकल्पनेचा ज्या पध्दतीने प्रभाव पडला होता. त्याप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीत काम करत असताना क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विचारांचाही प्रभाव पडलेला होता. कोणतीही गोष्ट पारंपारिक पध्दतीने करण्यापेक्षा त्या पध्दतीत सुधारणा करून ते कार्य करणे गरजेचे आहे. हा विचारही तात्यांना मार्गदर्शक ठरला. १९४० च्या दरम्यान आणि आजही लग्नासारखे कार्यक्रम मोठया दिमाखात करण्याची प्रथा आपल्या समाजात आहे. अशा गोष्टीवर मोठया प्रमाणावर पैसे खर्च केले जातात. म्हणून सुधारकी पध्दतीने कोणतेही कार्य करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. म्हणून तात्यांनी आपल्या बंधूंची व काही मित्रमंडळींची लग्ने कोणताही गाजावाजा न करता सर्व प्रथा, परंपरा मोडून केली. हा क्रांतीसिंह नाना पाटील यांचा विचार तात्यांना मार्गदर्शक ठरला. त्यामुळेच त्यांनी अनेक प्रकल्प हाती घेतले पण ते पारंपारिक पध्दतीने न करता त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, की ज्याचा उपयोग समाजाला होईल, तसेच "नाना पाटील यांची एक इच्छा होती ती म्हणजे माझा शेतकरी राजा सुखी व्हावा"[१३] हा विचार घेऊन तात्यांनी

आपले कार्य केले. शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून त्यांनी प्रत्येक गोष्ट केली.

संपूर्ण देशात दारिद्रय होते. पण कोल्हापूर हे संस्थान असे होते की, राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने तेथे सामाजिक समता, कृषि औद्योगिक विकास झालेला होता. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेती व्यवसाय सुधारण्यासाठी, पाण्याची सोय व्हावी म्हणून राधानगरी धरण बांधले. आज सरकार कोटयावधी रूपये खर्च करून धरण बांधून शेती पाण्याखाली आणण्याचा प्रयत्न करते. राजर्षी शाहू यांच्या सर्व कार्यात क्रांतीकारक कार्य म्हणजे शैक्षणिक कार्य होय. शिक्षणाशिवाय समाज सुधारणा नाही हे शाहूंनी ओळखले. इतर सर्व क्षेत्रातील सुधारणा होण्यासाठी जनता प्रथम ज्ञानी होण्याची आवश्यकता आहे. तरच इतर क्षेत्रात प्रगती होईल. तसेच बहुजन समाजात शैक्षणिक प्रसार झाला पाहिजे. यासाठी त्यांनी ग्रामीण आणि बहुजन समाजाला शैक्षणिक कवाडे उघडी केली. १९१५ च्या आसपास जातीभेद मोठया प्रमाणात पाळला जात होता. तेव्हा शैक्षणिक कार्यातून समाज सुधारले म्हणून प्रथम शिक्षण देण्यासाठी तसेच ग्रामीण जनेतच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शाहूराजांनी निरनिराळया जातीसाठी वसतिगृहे कोल्हापूर या ठिकाणी बांधली. एकाच जातीची मुळे एकत्र येऊन शिक्षण घेऊ लागली. त्यामुळे ग्रामीण आणि बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. तसेच स्त्रियांच्या शिक्षणाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले. काही सवलती स्त्रियांनाही दिल्या. त्यामुळे स्त्रियांचाही शैक्षणिक क्षेत्रात सहभाग झाला. खास करून निरनिराळया जाती-धर्मासाठी उभारलेली वसतिगृहे ही शैक्षणिक कार्यासाठी खास उपयोगी पडली. शैक्षणिक, कृषि क्षेत्रासाठी आज अनेक योजना सरकार मार्फत राबविल्या जातात. त्या योजना कोल्हापूर संस्थानात १९२० च्या आसपास राबविल्या जात होत्या. असा संस्थात पन्हाळा तालुक्यात कोडोली हे गाव असल्यामुळे राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराचा प्रभाव तात्यासाहेबांच्यावर पडणे साहजिकच होते. अगदी तारूण्य अवस्थेत

त्यांनी कोडोलीचे नगराध्यक्ष पद मिळाले होते. कोडोली हे गाव लहान असले तरी सुध्दा संस्थानच्या विशिष्ट नियमानुसार कोडोली या गावी नगराध्यक्ष पद होते. त्यामुळे त्यांना शाहूंच्या कार्याची जवळून ओळख झाली. तसेच १९४६ पासून कोडोली येथे वसतीगृह युक्त हायस्कूल स्थापन करून शाहूंचा वारसा पुढे चालविण्याचे काम तात्यांनी केले. या हायस्कूलमुळे वारणा परिसरातील विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय झाली तसेच वसतीगृहामुळे विद्यार्थी स्वयंपूर्ण होण्यास मदत झाली. फार कष्टाने हे कोडोलीचे हायस्कूल स्थापन केले. १९६३ पासून वारणा विभाग शिक्षण संस्था स्थापन करून शैक्षणिक कार्य पुढे चालू ठेवले. राजर्षी शाहू यांच्या कृषि क्षेत्रातील सुधारणांनी तात्यांना आकर्षित केले. या गोष्टीचा तात्यांच्या विचारसरणीवर परिणाम झाला होता.

यशवंतराव चव्हाण हे तात्यांचे स्नेही होते १९३५ पासून तात्यांचा आणि चव्हाणसाहेबांचा घनिष्ठ संबंध आला. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेला आपला मित्र, त्यांच्याकडे असणारी दूरदृष्टी, विचारशक्ती, संघटन या गोष्टीचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. त्यांना आपले गुरूतुल्य मित्र मानले. त्याच्या विचारांचा तात्यांच्यावर प्रभाव होता. कृषि-औद्योगिक समाज निर्माण झाला पाहिजे असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. अशा प्रकारचा समाज निर्माण करण्यासाठी तात्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागात शिक्षणाची सोय व्हावी म्हणून राजर्षी शाहू यांचे विचार पुढे आणण्याचे काम कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अविरत प्रयत्न करत होते. भाऊराव पाटील हे सुध्दा वारणा खोऱ्यातील असल्यामुळे त्यांच्या कार्याकडे तात्यांचे लक्ष गेले. कर्मवीर आण्णांनी बहुजन समाजाला शिक्षण मिळावे म्हणून १९१४ मध्ये काले या ठिकाणी 'रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली' पुढे याचे कार्यालय 'सातारा' या जिल्हयाच्या ठिकाणी नेले. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. ग्रामीण तळागाळातील मुला-मुलींना शिक्षण मिळावे

म्हणून या संस्थेने अनेक शाळा, कॉलेज काढली, ज्ञानगंगा सामान्य जनतेच्या दारी नेली. त्यामुळेच आज सर्वसामान्य कुटुंबातील मुले-मुली शिक्षण घेऊ लागली. या विचाराचा तात्यांच्यावर प्रभाव पडला म्हणून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एवढे नसले, तरी आपल्या परीने शिक्षणाचे काम केले.

अशा पध्दतीने तात्यांच्या विचारप्रणालीवर वेगवेगळ्या विचारांचा कमी-जास्त प्रमाणात प्रभाव पडला होता. हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केला. याशिवाय कोडोलीतील जेष्ठ व्यक्ती, जवळचे काही मित्र उदा.रामभाऊ घाडगे, द.रा.पाटील, नानासाहेब केकरे, श.ब.कुलकर्णी, रामचंद्र ना.पाटील, ग.आ.देशमुख कोडोलीकर, बंधू दिनकर इ. यांच्या सहाय्याने आपले व्यक्तिमत्व विकसित केले.

असा एकूण तत्वप्रणालीचा तात्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडला आहे. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले. सुरवातीच्या काळात कोडोलीची सेवा सोसायटी, नगराध्यक्षपद हायस्कूल उभारणी इत्यादी कामातून सार्वजनिक कामाचा अनुभव आला. तेथून पुढे प्रजा परिषद, १९४२ चा लढा यात सहभाग त्यामुळे चळवळीत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. अन्यायाविरूध्द लढू लागले. १९५४ पासून पुढे सहकारी साखर कारखाना व इतर उद्योग, शैक्षणिक संस्था उभारणीतून ग्रामीण प्रश्नांची जाण आणि सोडवणूक झाली. अनेक विश्वासू सहकारी कार्यकर्ते मिळाले म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व फुलले आहे.

<u>समारोप</u> :-

'तात्यासाहेब कोरे - ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास' या प्रबंधातील पहिल्या प्रकरणामध्ये वि.आ. तथा ऊर्फ तात्यासाहेब कोरे यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय याचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. यात तात्यासाहेब कोरे यांचा जन्म, बालपण, शिक्षण, घराण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि तात्यासाहेब कोरे यांच्या ग्रामीण नेतृत्वाचा विकास इत्यादी मुद्यांचा संशोधनात्मक रितीने उल्लेख केला आहे. तात्यासाहेब कोरे यांचे व्यक्तिमत्व काही प्रमाणात अनुकूल व काही प्रमाणात प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत घडलेले आहे. त्यांचा जन्म व बालपण प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल बनविणारे होते. कारण घराण्याचा जास्तीत जास्त विश्वास श्रमावर होता. कोरे बंधूच्या श्रमाला फळ आले. त्यातच त्यांचा व्यापार व सावकारीचा व्यवसाय त्यांची प्रतिष्ठा वाढवित होता.

तात्यासाहेब यांनी शिक्षण घेताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यांची मॅट्रिक पूर्ण करण्याची इच्छा अपूर्ण राहिली. त्यांच्या शैक्षणिक जीवनातील गोड कटू अनुभवाचे वर्णन त्यांचे नेतृत्व विकसित करण्यास कसे उपयोगी पडले यांचा पाठपुरावा केला आहे. तात्यासाहेब यांचे मित्रमंडळ व वैचारिक जडणघडण यांचाही उल्लेख केला आहे. एकंदरीत तात्यासाहेब कोरे यांचे नेतृत्व शिक्षण बंद झाल्यानंतर विकसित झाले. हे त्यांच्या व्यक्तिमत्व परिचयावरून सिध्द होते.

## संदर्भ सूची

१) मी एक कार्यकर्ता - वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४, पृष्ठ क्र.१५

२) उपरोक्त पृष्ठ क्र.१७

३) उपरोक्त पृष्ठ क्र.२१

४) उपरोक्त पृष्ठ क्र.२२

५) उपरोक्त पृष्ठ क्र.२३

६) उपरोक्त पृष्ठ क्र.२४

७) अमृतमहोत्सव स्मरणिका पृष्ठ क्र.४

८) मी एक कार्यकर्ता वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती पृष्ठ क्र.३२

९) मी एक कार्यकर्ता - वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४, पृष्ठ क्र.३४

१०) उपरोक्त, पृष्ठ क्र.९२

११) राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता, पृ.१४४

१२) श्रीकांत वि.देशपांडे - भारतीय राजकीय विचारवंत - पृष्ठ क्र.३९

१३) साहेबजी बाळ सनदे जीवन संग्राम-राही प्रकाशन आष्टा, जून १९८९, पृष्ठ क्र.१७

****